**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**
**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक १००/२०१९** **दिनांक १३/१२/२०१९** **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०७/१२/२०१९ ते १३/१२/२०१९)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक १४/१२/२०१९ सकाळी ८:३० पासून १८/१२/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **०७/१२** | **०८/१२** | **०९/१२** | **१०/१२** | **११/१२** | **१२/१२** | **१३/१२** | | **१४/१२** | **१५/१२** | **१६/१२** | **१७/१२** | **१८/१२** |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३४.७ | ३४.९ | ३६.२ | ३६.३ | ३५.० | ३२.९ | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३२ | ३१ | ३१ | ३१ |
| २२.४ | २२.३ | २२.६ | २२.८ | २२.७ | २१.२ | - | **किमान तापमान (अं.से)** | २० | २१ | २० | २१ | २१ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ५ | ३ | १ | १ | १ |
| ८० | ८१ | ८८ | १०० | १०० | ९७ | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ७२ | ६३ | ६० | ६९ | ७१ |
| ६४ | ६६ | ७३ | ७५ | ७७ | ७३ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ४४ | ३८ | ३९ | ४० | ४० |
| २ | ३ | २ | ३ | २ | १ | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ७ | ८ | ७ | ९ | ११ |
| इ. | इ.उ. | इ.उ. | इ. | इ.उ. | आ. | - | **वाऱ्याची दिशा** | ई. | ई. | ई. | ई.पू. | पू. |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १४ व १५ डिसेंबर, २०१९ दरम्यान आकाश अंशत: ढगाळ राहील.**

**दिनांक १३ ते १९ डिसेंबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा कमी राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार ठाणे जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक चांगल्या स्वरूपाचा असून प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार सौम्य ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **आंबा** | **पालवी अवस्था** | • पालवी अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर तुडतुड्यांचा तसेच करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही १० मि.ली. अधिक संयुक्त बुरशीनाशक (कार्बेन्डॅझिम १२% + मन्कोझेब ६३%) १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **नारळ** | **-** | • किनारपट्टी भागामध्ये नारळ बागेत काळ्या डोक्याची अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असून किडीच्या अळ्या पानाच्या खालच्या भागावर जाळी तयार करून पानांतील हरितद्रव्य खाल्यामुळे पाने करपल्यासारखी दिसून येतात. किडीच्या नियंत्रणासाठी किडलेली पाने काढून नष्ट करावीत आणि १६ मि. ली. डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच किडीच्या जैविक नियंत्रणासाठी प्रति माड किडीच्या १२ अळ्या आढळून आल्यास गोनीओझस नेफटीडीस ह्या परोपजीवी किटकाची ३५०० प्रौढ कीटक प्रति हेक्टरी या प्रमाणात बागेत झावळ्यांवर सोडावेत. |
| **चिकू** | **फळधारणा** | • चिकूवर बी पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी चिकू बागेतील किडग्रस्त तसेच गळलेली सर्व फळे व पालापाचोळा गोळा करून नष्ट करावीत व बागेची स्वच्छता राखून बागेत पूरेसा सूर्यप्रकाश येईल असे पहावे. तसेच ५० टक्के प्रवाही प्रोफेनोफोस १५ मि. ली. किंवा १४.५ टक्के प्रवाही इंडोक्झाकार्ब ५ मि.ली किंवा २.८ टक्के प्रवाही डेल्टामेथ्रीन १० मि. ली. कीटकनाशक प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **मिरची** | **वाढीची अवस्था** | • मिरची पिकामध्ये तुडतुडे, पांढरी माशी व मावा किडीं पानांच्या खालच्या भागावर राहून पानांतील अन्नरस शोषून घेतात व त्यामुळे पाने पिवळी होतात. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच पिकामध्ये पिवळ्या चिकट कागदाच्या सापळ्याचा ४ ते ५ प्रति एकरी वापर करावा व शेतातील बांध स्वच्छ ठेवावेत. |
| **मोगरा** | **फुल अवस्था** | • मोगरा पिकावर कळी पोखरणारी अळी, पाने गुंडाळणारी अळी, कोळी व कळ्या खाणारी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडीच्या नियंत्रणासाठी प्रादुर्भावग्रस्त पाने व कळ्या काढून नष्ट कराव्यात व गरजेनुसार ५ टक्के निबोळी अर्काची फवारणी करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**